सात इमारतींचा स्वयंपुनर्विकास पूर्ततेच्या मार्गावर

मलिदा न देताच मंजुरी; दुप्पट आकाराचे घर आणि भरघोस कॉपर्स निधी मिळवून देण्यात यश

निशांत सरवणकर, लोकसत्ता



चेंबूरच्या सिंधी कॉलनीतील स्वयंपुनर्विकासातील चित्रा सोसायटी

मुंबई : टेबलावर वजन ठेवल्याशिवाय नियोजन प्राधिकरणाकडून मंजुरी मिळत नाही, हा समज खोटा ठरवत मुंबईतील सात इमारतींनी सुरू केलेला स्वयंपुनर्विकास आता पूर्ततेच्या मार्गावर आहे. सध्या असलेल्या घरापेक्षा फक्त २० ते ३० टक्के क्षेत्रफळ अधिक देण्याची तयारी दाखविणाऱ्या विकासकांना या रहिवाशांनी स्वतःच्या हिमतीवर दुप्पट आकाराचे घर तसेच भरघोस कॉर्पस निधी मिळवून चपराक दिली आहे.

म्हाडाचे माजी अध्यक्ष व वास्तुरचनाकार चंद्रशेखर प्रभू यांनी आठ-दहा वर्षांपूर्वी स्वयंपुनर्विकासासाठी रहिवाशांना प्रवृत्त केले; परंतु विकासकांशिवाय पुनर्विकास ही संकल्पनाच कोणी मान्य करायला तयार नव्हते. तरीही प्रभू यांनी आपले प्रयत्न सोडले नाहीत. आतापर्यंत त्यांनी या विषयावर ३८०० सभा घेतल्या. गेल्या तीन-चार वर्षांत फक्त सात इमारतींनी प्रत्यक्ष स्वयंपुनर्विकास सुरू केला असला तरी आता मुंबईसह पुणे-ठाण्यातील ७८० सहकारी गृहनिर्माण संस्थांनी स्वयंपुनर्विकासाची तयारी दर्शविली आहे. सात इमारतींपैकी तीन इमारतींचा स्वयंपुनर्विकास पूर्ण होऊन रहिवासी राहायला गेले आहेत.

स्वयंपुनर्विकासासाठी राज्य शासनाने १९ सप्टेंबर २०१९ रोजी अधिसूचना जारी केली. या अधिसूचनेनुसार स्वयंपुनर्विकास करणाऱ्या गृहनिर्माण संस्थांना दहा टक्के अधिक चटईक्षेत्रफळ, बँकेतील कर्जाच्या व्याजापोटी चार टक्के भार शासन उचलणार, बांधकामाखालील भूखंडावरील कर लागू असणार नाही, सर्व प्रकारचे चटईक्षेत्रफळ अधिमूल्य ५० टक्के आदी २४ सवलती स्वयंपुनर्विकासाला शासनाने दिल्या होत्या. आतापर्यंत सातपैकी अजितकुमार (गोरेगाव), शंभू निवास (मुलुंड) आणि जिनप्रेम (चारकोप) या इमारती पूर्ण झाल्या असून उर्वरित चार इमारती पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. मात्र यापैकी एकालाही या सवलतींचा लाभ मिळालेला नाही.

चेंबूर येथील चित्रा गृहनिर्माण संस्थेत मूळ सदनिका ४१० चौरस फूट असून विकासकाने ५२५ चौरस फुटांची सदनिका देण्याची तयारी दर्शविली. मात्र स्वयंपुनर्विकासानंतर रहिवाशांना ९६० चौरस फुटांची सदनिका मिळणार आहे. मुलुंडच्या पूर्वरंग सहकारी गृहनिर्माण संस्थेतील रहिवाशांना स्वयंपुनर्विकासानंतर ९०० चौरस फुटांची (मूळ सदनिका ४२५ चौरस फूट) सदनिका मिळणार आहे. घाटकोपर-पंतनगर म्हाडा सहकारी गृहनिर्माण संस्थेतील मूळ सदनिका २२५ चौरस फुटांची असताना आता स्वयंपुनर्विकासानंतर ८६० चौरस फुटांची सदनिका मिळणार आहे. आराखडे मंजूर झाल्याशिवाय इमारत रिक्त करावयाची नाही. भाडेही सहकारी गृहनिर्माण संस्थेकडूनच दिले जाते. त्यामुळे नियोजन प्राधिकरणाने आराखडे मंजूर करण्यास उशीर लावला तरी काहीही फरक पडत नाही. या प्रत्येक इमारतीसाठी आपण स्वतः जाऊन आराखडे मंजूर करून घेतो. त्यासाठी एकही अतिरिक्त मलिदा देत नाही. या रहिवाशांकडून आपण एकही पैसा घेतलेला नाही, असेही प्रभू यांनी सांगितले.

स्वयंपुनर्विकासाची सद्यःस्थिती :

अजितकुमार (गोरेगाव) - पूर्ण; शंभू निवास (मुलुंड) - पूर्ण; जिनप्रेम (चारकोप)- पूर्ण, बँक कर्जाची मदत न घेता सदनिका पूर्वविक्रीतून निधी जमा; मुलुंड जनकल्याण - दोन मजले पूर्ण; पूर्वरंग (मिठागर, मुलुंड) - दोनमजली तळघर, पोडिअम आणि सहा मजले पूर्ण; चित्रा (चेंबूर) - १२ मजल्यांपर्यंत काम पूर्ण, आणखी दोन मजले शिल्लक; गुड अर्थ (चेंबूर, सिंधी कॉलनी) - आराखडे मंजुरीच्या प्रतीक्षेत.

केतकी चितळेचा लॅपटॉप, मोबाइल जप्त

ठाणे : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याविरोधात समाजमाध्यमावर आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी अटकेत असलेली अभिनेत्री केतकी चितळे हिच्या नवी मुंबई येथील कळंबोली निवासस्थानातून पोलिसांनी लॅपटॉप आणि एक मोबाइल जप्त केला आहे.

या लॅपटॉप आणि मोबाइलच्या माध्यमातून हा मजकूर नेमका केतकीने लिहिला आहे का, हे उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. केतकी चितळे हिने तिच्या फेसबुक खात्यावर शरद पवार यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केला आहे. या प्रकारानंतर तिच्याविरोधात कळवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या युनिट एकने तिला अटक केली. केतकीच्या मजकुराखाली एका व्यक्तीचे नाव लिहिण्यात आले आहे. सोमवारी पोलीस केतकीला घेऊन तिच्या निवासस्थानी गेले होते.

ग्रामोफोन तबकड्यांचे संग्राहक प्रभाकर दातार यांचे निधन

लोकसत्ता प्रतिनिधी



शाकुंतल ते कुलवधू

दातार यांच्या संग्रहातून रेकॉर्ड्स मिळवून ग्रामोफोन कंपनीने कितीतरी ध्वनिमुद्रिका आणि कॅसेट्स, सीडी वितरित केल्या. 'शाकुंतल ते कुलवधू' असा चार कॅसेट्सचा संच त्यांच्याच निवडीतून साकार झाला होता

पुणे : ग्रामोफोन तबकड्यांचे संग्राहक प्रभाकर दातार (वय ९३) यांचे वृद्धापकाळाने गेल्या शनिवारी निधन झाले. त्यांच्या संग्रहात दहा हजारांहून अधिक ग्रामोफोन तबकड्या होत्या.

शास्त्रीय संगीताचे जाणकार असलेले दातार रिझर्व्ह बँक ऑफ इंडियातून सेवानिवृत्त झाले होते. १९९०मध्ये 'सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टर्स'ची स्थापना झाली. या संस्थेच्या संस्थापकांपैकी ते एक होते.

गेली २५ वर्षे ते पिंपरी येथे वास्तव्यास होते, पण 'कुर्ल्याचे रेकॉर्ड कलेक्टर प्रभाकर दातार' अशीच त्यांची ओळख गाण्यांच्या शौकिनांना आणि अभ्यासकांना होती. कुर्ल्याच्या त्यांच्या घरात गेलेली कोणतीही लहान-मोठी व्यक्ती कधीही रिक्त मनाने परत फिरत नसे. ज्याला जे आवडेल ते गाणे ऐकवल्याशिवाय दातार यांना चैन पडत नसे. मराठी नाट्यसंगीत, चित्रपट संगीत आणि त्या अनुषंगाने येणारे शास्त्रीय संगीत हा त्यांच्या संग्रहाचा विशेष होता. त्यांना छोटा गंधर्व, पु. ल. देशपांडे ह्यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले होते. पिंपरीला येण्यापूर्वी त्यांनी बऱ्याच रेकॉर्ड्स सोसायटीला आणि संग्राहकाना भेट दिल्या. त्यातल्या पुष्कळ आता सोसायटीच्या वतीने समाज माध्यमांवर ऐकायला मिळतात. वेगवेगळे विषय निवडून त्यावर निवेदनाच्या माध्यमातून माहिती देत ध्वनिमुद्रिका ऐकविणे असे अनेक कार्यक्रम दातार यांनी सादर केले.

'ब्रह्मचारी' चित्रपटातील 'यमुनाजळी खेळू खेळ कन्हैया' हे गीत श्रीधर पार्सेकर यांनी व्हायोलिनवर वाजविले होते. हे दुर्मीळ ध्वनिमुद्रण दातार यांच्या संग्रही होते. गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर, पं. गोविंदराव अग्नी, पं. सुरेश हळदणकर, केसरबाई बांदोडकर यांच्या गायनाच्या ध्वनिमुद्रिका दातार यांच्या संग्रही होत्या.

राज्यात पहिल्यांदाच चार वाघिणींचे स्थानांतर

नागपूर : व्याघ्र संवर्धनातील स्थानांतराच्या पहिल्या टप्प्यात ब्रह्मपुरी येथील चार वाघिणींना नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात सोडण्याचा निर्णय राज्याच्या वनखात्याने घेतला आहे. राज्यातील हा पहिलाच प्रकल्प असून मे महिन्याच्या अखेरीस यातील दोन वाघिणींना या व्याघ्रप्रकल्पात सोडण्याचे संकेत वनखात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिले. गेल्या काही वर्षात राज्यात मानव-वन्यजीव संघर्ष प्रचंड वाढला आहे. २०२१ मध्ये या संघर्षात ८४ माणसे मारली गेली.


उष्णता आणि आर्द्रतेवर करा मात
देऊन मध्य रेल्वेच्या एसी लोकलची साथ
भाडे झाले निम्मे आता (०५.०५.२०२२ पासून लागू)
आनंद घ्या - थंडगार, आरामशीर आणि स्वस्त प्रवासाचा

प्रवास भाडे तुलना

मार्ग	एसी ट्रेन (सिंगल प्रवास)	एसी कॅब/टॅक्सी (गतिमान भाडे-अंदाजे) मिनी	सेडान
छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - ठाणे (३४ कि.मी.)	₹९५	₹५२६	₹६६३
छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - कल्याण (५४ कि.मी.)	₹१०५	₹८३१	₹१०४९

मेन लाईन (रविवार आणि सुट्टीचे दिवस वगळता)

पासून - ते	जलद (प्रस्थानाची वेळ)	धीमी (प्रस्थानाची वेळ)
कुर्ला-सीएसएमटी	--------	स. ४.४६ वा.
ठाणे-सीएसएमटी	स. ८.०२ वा., स. ९.०३ वा., सां. ३.०३ वा.	स. ५.२४ वा.*, स. ७.०४ वा., सां. २.२२ वा., सां. ६.५७ वा.
कल्याण-सीएसएमटी	स. ६.३२ वा., स. ८.५४ वा., सां. ५.२७ वा.	सां. ७.५६ वा., सां. ९.३६ वा., सां. १०.५६ वा.
अंबरनाथ-सीएसएमटी	सां. ३.१२ वा.*, सां. ८.५० वा.*	स. ११.१७ वा.
डोंबिवली-सीएसएमटी	--------	स. ११.४८ वा.*, सां. ४.५५ वा., सां. ७.५० वा.
अंबरनाथ-दादर	सां. ६.३० वा.*	--------
बदलापूर-सीएसएमटी	सां. १२.२७ वा., सां. १.४८ वा.	--------
कल्याण-दादर	स. १०.०२ वा., स. ११.२२ वा.	सां. ११.११ वा.
टिटवाळा-सीएसएमटी	सां. ४.४७ वा.	स. ८.३३ वा.*
सीएसएमटी-कुर्ला	--------	स. ००.३१ वा.
सीएसएमटी-कल्याण	स. ५.२० वा., स. ७.४३ वा., स. ८.५६वा., स. १०.०४ वा., सां. ४.१० वा., सां. ६.३६ वा., सां. ९.४२ वा. (सेमी-जलद)	सां. ८.०० वा., सां. ९.१६ वा.
सीएसएमटी-ठाणे	स. ८.०४ वा., सां. २.०३ वा., सां. ६.१० वा.	सां. १.०६ वा., सां. १०.२० वा.*, सां. ११.१२ वा.
दादर-ठाणे	--------	स. ००.२९ वा.
दादर-बदलापूर	स. ११.०८ वा., सां. १२.३० वा.,	--------
दादर-अंबरनाथ	सां. ७.३९ वा.*,	--------
सीएसएमटी-टिटवाळा	सां. ३.१९ वा.,	स. ६.३० वा.*
सीएसएमटी-अंबरनाथ	स. ९.५१ वा., सां. ५.०० वा. (सेमी-जलद)*	सां. १.१५ वा.*
सीएसएमटी-डोंबिवली	--------	स. १०.२२ वा.*, सां. ३.२४ वा., सां. ६.१८ वा.

(*१४.०५.२०२२ पासून सेवेत)

आता रविवार आणि सुट्टीच्या दिवशीही एसी सेवेचा लाभ घ्या (*१४.०५.२०२२ पासून सेवेत)

पासून - ते	जलद (प्रस्थानाची वेळ)	धीमी (प्रस्थानाची वेळ)
कुर्ला-सीएसएमटी	--------	स. ४.४६ वा.
कल्याण-सीएसएमटी	स. ६.३२ वा., स. ८.५४ वा.	सां. ७.५६ वा.
डोंबिवली-सीएसएमटी	--------	सां. ४.५५ वा.
बदलापूर-सीएसएमटी	सां. १.४८ वा.	--------
कल्याण-दादर	स. ११.२२ वा.	--------
दादर-बदलापूर	सां. १२.३० वा.	--------
सीएसएमटी-कुर्ला	--------	सां. ९.५६ वा.
सीएसएमटी-कल्याण	स. ५.२० वा., स. ७.४३ वा., स. १०.०४ वा., सां. ६.३६ वा.	--------
सीएसएमटी-डोंबिवली	--------	सां. ३.२४ वा.

सीएसएमटी : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस

आज़ादी का अमृत महोत्सव
मध्य रेल्वे
थांबे आणि वेळेच्या तपशीलांसाठी QR कोड स्कॅन करा.
cr.indianrailways.gov.in ला भेट द्या किंवा YATRI MUMBAI LOCALॲप डाउनलोड करा

MCXCCL

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई–मेल आयडी: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: https://www.mcxccl.com

३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिक व वार्षिक लेखापरिक्षित आर्थिक परिणामांचे सार

(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३१ मार्च २०२२ लेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर २०२१ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ मार्च २०२१ लेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०२२ लेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०२१ लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	२,१६२	१,७९८	२,०७५	७,६०२	८,६९०
२. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर, अपवादात्मक व / किंवा असाधारण बाबींपूर्वी)	८०३	५३२	८५७	२,६३४	३,७२७
३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व / किंवा असाधारण बाबींनंतर)	८०३	५३२	८५७	२,६३४	३,७२७
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व / किंवा असाधारण बाबींनंतर)	७९५	५३८	८५९	२,६२६	३,७३०
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	८०४	५३१	८६८	२,५७५	३,७३३
६. समभाग भांडवल (₹१०/– प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्यालेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	–	–	–	(१३,६८२)	(१६,२५८)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/– प्रत्येकी)*					
मूलभूत (₹)	०.३३	०.२२	०.३६	१.०९	१.५५
सौमिकृत (₹)	०.३३	०.२२	०.३६	१.०९	१.५५

* अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.

नोंद:

१. वरील तक्ता त्रैमासिक व वार्षिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ **www.mcxccl.com** वर उपलब्ध आहे.

२. वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून दिनांक १६ मे, २०२२ रोजी केले गेले आहे आणि दिनांक १६ मे, २०२२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/–
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ: मुंबई | दिनांक: १६ मे, २०२२

भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ

(भारत सरकारचे उपक्रम)
नोंदणीकृत कार्यालय: 'सुरक्षा', 170, जे टाटा रोड, चर्चगेट, मुंबई–400020
दूरध्वनी: + 91–22–2286 7000 फॅक्स: + 91–22–2288 4010
वेबसाइट: www.gicofindia.com ई–मेल: investors.gic@gicofindia.com
सीआयएन: L67200MH1972GOI016133 आयआरडीएआय नोंदणी क्र.:112

आपकाले रक्षिष्यामि
GIC Re

टपाल मतदान आणि दूरस्थ इ–मतदानाबाबतची सूचना

सभासदांना येथे सूचित करण्यात येते की, कंपनी कायदा 2013 (''कायदा'') चे कलम 108 आणि कलम 110 मधील तरतुदींना अनुसरून तसेच कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, 2014 मधील नियम 20 आणि नियम 22, सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिसक्लोजर रिक्वायरमेंटस्) नियमावली 2015 मधील नियमावली 44, कंपनी व्यवहार मंत्रालयाने (''एमसीए'') जारी केलेले सामान्य परिपत्रके क्रमांक 14/2020, 17/2020, 22/2020, 33/2020, 39/2020, 10/2021 आणि 20/2021(एकत्रितपणे ''एमसीए परिपत्रके'' म्हणून संदर्भित) यांच्या एकत्रित वाचनासह अन्य लागू असलेले कायदे, नियम आणि नियमावली (काही वैधानिक फेरफार किंवा त्यामध्ये सध्या लागू असलेल्या आणि वेळोवेळी सुधारित केल्याप्रमाणे) यांना अनुसरून 16 मे 2022 च्या टपाल मतदान नोटीस (''नोटीस'') मध्ये निर्धारीत करण्यात आलेल्या विशेष कामकाजाला भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळच्या (''कॉर्पोरेशन'') सभासदांची दूरस्थ इ–मतदानाच्या माध्यमातून टपाल मतदानाआधारे मंजुरी घेण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

सदस्यांना याद्वारे कळविण्यात येते की –

1. कॉर्पोरेशनने 16 मे 2022 रोजी सभासदांना ईमेलद्वारे सूचना पाठवण्याचे काम पूर्ण केलेले आहे.
2. सदर सूचना स्पष्टीकरणात्मक विधानासह कॉर्पोरेशनच्या www.gicofindia.com या संकेतस्थळावर, इ–मतदानाची जबाबदारी सांभाळणारी एजन्सी मेसर्स केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेडच्या (''केफिनटेक'') https://evoting.kfintech.com या संकेतस्थळावर तसेच स्टॉक एक्सचेंज(स्) म्हणजेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडचे (एनएसई) www.nseindia.com आणि बीएसई लिमिटेडचे (बीएसई) ww.bseindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.
3. रिमोट ई–मतदान सुविधेचा लाभ घेण्यासाठी सदस्यांची पात्रता तपासण्याच्या उद्देशाने अंतिम तारीख ('कट–ऑफ') 13 मे 2022 आहे. ज्या सदस्यांचे नाव कट–ऑफ तारखेपर्यंत कॉर्पोरेशनच्या सभासदांच्या रजिस्टरमध्ये किंवा डिपॉझिटरीजद्वारे राखलेल्या लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नोंदवलेले आहे, असेच सभासद दूरस्थ इ–मतदान सुविधेचा लाभ घेण्यास पात्र राहतील.
4. एमसीए परिपत्रकांचे पालन करताना, नोटिस, टपाल मतदानाचा फॉर्म आणि प्रीपेड व्यवसाय उत्तर लिफाफा यांची छापील प्रत सदस्यांना पाठवण्यात आलेली नाही. त्यामुळे, सभासदांना त्यांचा होकार अथवा नकार फक्त दूरस्थ इ–मतदान प्रणालीद्वारे कळवणे आवश्यक आहे. दूरस्थ इ–मतदानाची सुविधा देण्यासाठी कॉर्पोरेशनने केफिनटेकला नियुक्त केलेले आहे.
5. दूरस्थ इ–मतदानाची तपशीलवार प्रक्रिया/सूचना संबंधित सूचनेमध्ये नमूद केलेली आहे.
6. दूरस्थ इ–मतदानचा कालावधी मंगळवार, 17 मे 2022 रोजी सकाळी 9.00 वाजता (भाप्रवे) सुरू होईल आणि बुधवार, 15 जून 2022 रोजी संध्याकाळी 5.00 वाजता (भाप्रवे) समाप्त होईल. दूरस्थ इ–मतदान यंत्रणा त्यानंतर केफिनटेकव्दारे खंडीत केली जाईल. एकदा ठरावावर सदस्याने मतदान केल्यानंतर त्यात नंतर कोणताही बदल त्याला करता येणार नाही.
7. इमेल पत्ताची नोंदणी / अद्ययावत करण्याची पद्धत:

भौतिक स्वरुपातील धारणा	ज्या सभासदांकडे समभाग भौतिक स्वरुपात आहेत त्यांनी आपल्या इमेल पत्त्याची नोंदणी करण्यासाठी कॉर्पोरेशनला (investors.gic@gicofindia.com) अथवा आरटीए, केफिनटेकला (einward.ris@kfintech.com) आपले इमेल पाठविण्याची विनंती केली जात आहे.
डिमॅट स्वरुपातील धारणा	डीमटेरिअलाइज्ड स्वरुपात समभाग धारण करणाऱ्या सभासदांना त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे त्यांच्या ईमेल पत्ताची नोंदणी/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते.

8. टपाल मतदान प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी कॉर्पोरेशनने छाननीकर्ता म्हणून मेसर्स रागिनी चोक्शी अँड कंपनीचे कंपनी सचिव कु. रागिणी चोक्शी (FCS 2390) आणि त्यांच्या अनुपस्थितीत श्री उमाशंकर हेगडे (ACS 22133) यांची नियुक्ती केलेली आहे.
9. छाननीकर्त्यांच्या अहवालासह मतदानाचा निकाल 17 जून 2022 रोजी किंवा त्यापूर्वी जाहीर केला जाईल आणि तो कॉर्पोरेशन (www.gicofindia.com) आणि केफिनटेकच्या संकेतस्थळावर (https://evoting.kfintech.com) सुध्दा प्रसिध्द केला जाणार आहे. तसेच मतदानाचा निकाल शेअर बाजारांना अर्थात एनएसई आणि बीएसईला एकाच वेळी कळवले जाईल.
10. रिमोट इ–मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यासंदर्भात काही शंका,/तक्रारी असल्यास सभासद केफिनटेकचे श्री. मोहम्मद मोहसीनुद्दीन यांना einward.ris@kfintech.com वर इमेल पाठवून त्यांच्याशी संपर्क साधू शकतात अथवा 1–800–309– 4001 (टोल फ्री) या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळसाठी
स्वाक्षरी/–
सतीश कुमार
कंपनी सचिव

स्थळ : मुंबई
दिनांक : १६–०५–२०२२